**महाराष्ट्र जनशक्ती** | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २८५ वे | दिनांक : ११/१०/२०२६ | वार : रविवार


## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पुढाकारातून साकारलेल्या 'पंढरपूर वारी' माहितीपटाचा जागतिक सन्मान



**मुंबई :** महाराष्ट्राच्या समृद्ध आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या 'पंढरपूर वारी – इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' या माहितीपटाने आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. प्रतिष्ठित 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स 2026'मध्ये या माहितीपटाची 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' (Best Branded Programme) या श्रेणीत भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे. माहिती व जनसंपर्क विभागामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी यांच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या या माहितीपटाच्या माध्यमातून महाराष्ट्राची भक्तिपरंपरा, संतांचे विचार आणि पंढरपूर वारीचे सांस्कृतिक महत्त्व जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचले आहे.

पंढरपूरची आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील अत्यंत महत्त्वाची परंपरा आहे. शेकडो वर्षांपासून सुरू असलेल्या या वारीत संतांच्या अभंगांचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि विठ्ठलनामाचा जयघोष करत लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करतात. भक्ती, श्रद्धा, समता आणि बंधुभावाचा संदेश देणाऱ्या या परंपरेचे वैशिष्ट्य केवळ धार्मिक स्वरूपापुरते मर्यादित नसून, ती महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक एकात्मतेचेही प्रतीक आहे. हाच समृद्ध वारसा देशाच्या सीमा ओलांडून जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या माहितीपटाची निर्मिती करण्यात आली.

'पंढरपूर वारी – इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' हा 22 मिनिटांचा इंग्रजी भाषेतील माहितीपट आहे. संत नेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्यासह महाराष्ट्रातील संतपरंपरेने समाजाला दिलेला भक्ती, मानवता, समता आणि बंधुभावाचा संदेश या माहितीपटाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांसमोर मांडण्यात आला आहे.महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाची वैशिष्ट्ये, वारीचे आध्यात्मिक महत्त्व आणि विठ्ठलभक्तीभोवती एकत्र आलेल्या लाखो वारकऱ्यांची परंपरा यांचा परिचय जागतिक प्रेक्षकांना करून देणे हा या निर्मितीमागील प्रमुख उद्देश आहे. भाषेच्या मर्यादा ओलांडून संतविचारांचा व्यापक प्रसार व्हावा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाची आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण व्हावी, या दृष्टीने माहितीपट महत्त्वपूर्ण ठरत आहे. माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी यांच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या या माहितीपटाचे डिस्कवरीच्या जगभरातील विविध वाहिन्यांवर प्रसारण करण्यात आले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या परंपरा, श्रद्धा आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळाले आहे.

आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील विविध देशांमधून सादर झालेल्या निर्मितींमध्ये 'पंढरपूर वारी – इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' या माहितीपटाची भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली. 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' या श्रेणीतील हा बहुमान माहितीपटाच्या आशयाची आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाची दखल घेणारा ठरला आहे. या यशामुळे महाराष्ट्रातील धार्मिक-सांस्कृतिक परंपरा प्रभावी दृक्श्राव्य माध्यमातून जागतिक स्तरावर मांडण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन मिळाले आहे. वारीसारख्या शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या सांस्कृतिक सोहळ्याचे आधुनिक माध्यमांच्या मदतीने आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांपर्यंत सादरीकरण करता येते, हे या माहितीपटाने अधोरेखित केले आहे. 'वारी सर्वांना विठुरायाच्या रंगात रंगवून एकत्र आणते' – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या आंतरराष्ट्रीय बहुमानाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंढरपूर वारीच्या समतेच्या आणि एकात्मतेच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, पंढरपूर वारी ही भक्तिमार्गातील अतिशय प्राचीन परंपरा आहे. जात, धर्म, गरीब-श्रीमंत असा कोणताही भेद न करता ही परंपरा सर्वांना विठुरायाच्या भक्तिरंगात रंगवून एकत्र आणते. वारीची महान परंपरा, तिच्यामागील उद्देश आणि संतांनी दिलेले विचार जगभरात पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत 'पंढरपूर वारी – इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' ही माहितीपट निर्मिती करून प्रदर्शित करण्यात आला. या माहितीपटाला 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स 2026'मध्ये भारतासाठी 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' श्रेणीतील राष्ट्रीय पुरस्कार मिळाला, ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. या यशाबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी यांचे अभिनंदन केले. तसेच, वारीची गौरवशाली परंपरा आणि संतांचे विचार जगासमोर मांडणारा हा माहितीपट सर्वांनी पाहावा, असे आवाहनही त्यांनी केले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाला आंतरराष्ट्रीय व्यासपीठ माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनीही या यशाचे महत्त्व स्पष्ट केले. आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील विविध देशांमधून सादर झालेल्या दर्जेदार निर्मितींमधून या माहितीपटाची भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाल्याचे त्यांनी सांगितले. या बहुमानामुळे महाराष्ट्राची भक्तिपरंपरा, संतसाहित्य, सामाजिक समतेचा संदेश आणि वारीची वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक परंपरा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाली आहे. महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी दृक्श्राव्य माध्यमांचा प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीने हा सन्मान महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

## 'रोहित पवारांचं डोकं मेंढराच्या डागणीने डागलं पाहिजे'

**सांगली :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षांमधील कथित गोंधळ आणि आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. आयोगाच्या कारभाराविरोधात विद्यार्थ्यांनी आक्रमक भूमिका घेतली असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात आंदोलन करण्यात आले. या आंदोलनावरून भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी रोहित पवार यांच्यावर अत्यंत आक्रमक शब्दांत टीका केली आहे. 'रोहित पवारांचं डोकं मेंढराच्या डागणीने डागलं पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा तमाशा केला,' अशा शब्दांत पडळकर यांनी संताप व्यक्त केला. सांगली येथे बोलताना त्यांनी रोहित पवार यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. पडळकर यांच्या या विधानामुळे MPSC आंदोलनावरून सत्ताधारी आणि विरोधकांमधील राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांमधील अडचणी आणि कथित अनियमिततांवरून विद्यार्थी सातत्याने आवाज उठवत आहेत. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून राज्यात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. आयोगाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत काही विद्यार्थ्यांनी आयोगाच्या अध्यक्षांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली आहे. या मागणीसाठी पुण्यात आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे सरकार आणि आयोगाचे लक्ष वेधणे, तसेच परीक्षांशी संबंधित अडचणींचे निराकरण करण्यासाठी दबाव निर्माण करणे, हा या आंदोलनामागील प्रमुख मुद्दा असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या आंदोलनावरून आता राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी रोहित पवार यांच्या भूमिकेवर आक्षेप घेत आंदोलनाच्या पद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. गोपीचंद पडळकर यांनी रोहित पवार यांच्या भूमिकेतील कथित विरोधाभासावर बोट ठेवले. पोलिस आयुक्तांसोबत झालेल्या बैठकीचा संदर्भ देत त्यांनी रोहित पवार यांच्या आधीच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित केला. पडळकर म्हणाले, 'रोहित पवार यांचे डोके मेंढराच्या डागणीने डागले पाहिजे. सीपी महोदयांसोबत बैठक झाली होती. त्यावेळी हेच रोहित पवार आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची आवश्यकता नाही, असे म्हणाले होते. मग आता पुन्हा हा विषय कसा काय काढता?' रोहित पवार यांनी यापूर्वी घेतलेली भूमिका आणि आता आंदोलनादरम्यान करण्यात येत असलेली राजीनाम्याची मागणी यामध्ये विसंगती असल्याचा दावा पडळकर यांनी केला. आंदोलन करणे आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी आवाज उठवणे याला आपला विरोध नसल्याचे सांगत त्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून नेमके काय साध्य केले जात आहे, असा सवाल उपस्थित केला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ११ ऑक्टोबर २०२६


## जिल्हास्तरीय नेटबॉल स्पर्धेत एस.पी. स्कूलचा डंका; मुला-मुलींचा संघ उपविजेता



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद क्रीडा परिषद व महानगरपालिका अंतर्गत जिल्हास्तरीय शालेय नेटबॉल क्रीडा स्पर्धा विभागीय क्रीडा संकुल, छत्रपती संभाजीनगर येथे नुकतीच पार पडली.या स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात एस.पी. स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, फुलंब्रीच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत मुलांच्या व मुलींच्या दोन्ही संघांनी उपविजेतेपद पटकावले.या स्पर्धेत जिल्ह्यातील अनेक शाळांच्या संघांनी सहभाग घेतला होता. अटीतटीच्या सामन्यात एस.पी. स्कूलच्या खेळाडूंनी सांघिक खेळ, चपळता आणि उत्कृष्ट रणनीतीचे प्रदर्शन केले.विजेते खेळाडू :मुलांचा संघ : जय जाधव, तन्मय मगरे, समर्थ मालोदे, युवराज सुरासे, युवराज मालोदे, सचिन मालोदे, ओंकार मालोदे, विठ्ठल मालोदे, शुभम पोपळघट, जगदीश मालोदे.मुलींचा संघ : निकिता मालोदे, संचिता भागवत, दिपाली कापरे, गायत्री मालोदे, भारती पाचपुते, सारिका मालोदे, भक्ती मालोदे, सानिया शेख, समीक्षा पवार, समृद्धी मालोदे, भावना भालेराव, जया अहिरे.या सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक रावसाहेब मालकर व संदीप मालोदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य गजानन तायडे यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन केले असून पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## आडगाव येथे विहिरीत पडलेल्या बिबट्याची सुरक्षित सुटका



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यातील आडगाव (जेहूर) येथील शिवारातील गट क्र. 61 मधील ज्ञानेश्वर निकम यांच्या शेतातील विहिरीत पडलेल्या मादी बिबट्याची प्रादेशिक वन विभागाने स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने यशस्वी सुटका केली आहे. दि. 10 ऑक्टोबर रोजी सकाळी 09:30 वाजता वनविभागाला याबाबत माहिती मिळताच विभागाच्या बचाव पथकाने तात्काळ दखल घेत घटनास्थळी दाखल झाले. विहीरीत पडलेल्या बिबट्याला पिंजऱ्याच्या साहाय्याने सुरक्षित बाहेर काढून पशुवैद्यकीय तपासणीनंतर नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक वनविभागाचे वनसंरक्षक प्रमोदचंद लाकरा, उपवनसंरक्षक सुवर्णा माने आणि सहायक वनसंरक्षक विशाल कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली, वनपरिक्षेत्र अधिकारी शिवाजी टोंपे यांच्या नेतृत्वात ही मोहीम राबविण्यात आली. वनपाल संजय कादी, वनसेवक अशोक आव्हाड, देविदास राठोड, शेख मकसूद सईद, वाहनचालक भाऊसाहेब वाघ व सुरेश राठोड तसेच संरक्षण मजूर रामेश्वर राठोड व लक्ष्मण सावंत यांनी बचावकार्यात सहभाग घेतला. या मोहिमेत लक्ष्मण निकम, गणेश शिंदे, उपसरपंच राहुल सोनवणे, योगेश शिंदे, सोपान निकम, भावेश शिंदे, कल्याण गायकवाड, विशाल बहिरव, रवि सोनवणे, जनार्दन झिमन आणि किशोर बहिरव इत्यादी स्थानिक नागरिकांनी सहकार्य केले. यशस्वी बचाव मोहिमेबद्दल नागरिकांनी वन विभागाचे आभार मानले.एखादा वन्यप्राणी अडचणीत आढळल्यास नागरिकांनी स्वतःहून बचावकार्य न करता तातडीने वन विभागाला कळवावे. अशा वन्यजीवांपासून सुरक्षित अंतर राखावे. तसेच बचाव पथकाला सहकार्य करावे, असे आवाहन कन्नड चे वनपरिक्षेत्र अधिकारी शिवाजी टोंपे यांनी केले.

## सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयात "जागतिक टपाल दिन" साजरा



**कन्नड (अरचण थोरात) :** राष्ट्रीय टपाल सप्ताह निमित्त कन्नड येथील कन्या विद्यालयात पत्रलेखन स्पर्धा संपन्न झाली .भारतीय डाक विभागाचे योगदान व कार्य समजून घेण्यासाठी सदर स्पर्धा आयोजित करण्यात आली . जागतिक स्तरावर टपाल सेवांचे महत्व ,सामाजिक आणि आर्थिक विकासातील पोस्टल सेवांचे योगदान,पोस्ट विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या योजना इत्यादीचे मार्गदर्शन चापानेर येथील पोस्ट विभागाचे प्रमुख अनिल कापुरे साहेब यांनी विद्यार्थ्यांना दिली .या कार्यक्रमाच्या प्रसंगी कन्नड पोस्ट ऑफिसचे संजय राठोड तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनीता दळवी, प्रा. विजय भोसले, संजय जाधव ,हरिश्चंद्र शेवरे ,नारायण पुज रोड, लक्ष्मण चादर इत्यादी सह शिक्षक व शिक्षिका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सह देशातील व महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांना कन्नड तालुक्यातील दुष्काळ व विकासासंदर्भात मागाण्यांचे पत्र तथा आई स पत्र लिहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय त्रिभुवन यांनी केले .स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.

## इकरा पब्लिकच्या उमर खानची विभागीय स्पर्धेसाठी निवड

**जळगाव :** वेगाला जिद्दीची जोड, सरावाला मेहनतीची साथ आणि ध्येय गाठण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती यांच्या बळावर इकरा पब्लिक स्कूलच्या उमर आसिफ खानने जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत दिमाखदार यश संपादन केले. वयोगट १४ वर्षांखालील ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत त्याने रौप्यपदकावर आपले नाव कोरले असून, त्याची विभागीयस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.उमरच्या या यशामुळे इकरा पब्लिक स्कूलच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा खोवला गेला आहे.जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,जळगाव आणि पंचायत समिती शिक्षण विभाग,जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वेग, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर उमरने प्रतिस्पर्ध्यांना दमदार टक्कर देत हे यश मिळवले.त्याच्या या कामगिरीमुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशस्वी वाटचालीला आणखी बळ मिळाले आहे.क्रिकेट, कॅरम, कुस्ती, रग्बी, ॲथलेटिक्स,जलतरण आणि फुटबॉल अशा विविध क्रीडाप्रकारांमध्ये इकरा पब्लिक स्कूलचे विद्यार्थी सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत आहेत.खेळाडूंच्या या यशस्वी वाटचालीमागे शिस्तबद्ध सराव,योग्य नियोजन आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाची भूमिका बजावत आहे. उमरच्या यशामागे क्रीडा शिक्षक आमिर खान यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि अथक परिश्रमही महत्त्वाचे ठरले.उमरच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आणि विभागीयस्तरीय स्पर्धेसाठी झालेल्या निवडीबद्दल इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.करीम सालार, जनरल सेक्रेटरी एजाज मलिक आणि प्राचार्य शेख शकील यांनी उमर आसिफ खान तसेच क्रीडा शिक्षक आमिर खान यांचे विशेष अभिनंदन केले.विभागीय स्पर्धेसाठी उमरला शुभेच्छा देत, आगामी स्पर्धेतही अशीच दमदार कामगिरी करून शाळेचा नावलौकिक उंचावावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ११ ऑक्टोबर २०२६


## नटसम्राट हरवला

नाना अष्टपैलू महानायक
अभिनयाचा खळखळता झरा
अन्यायाविरुद्ध लढणारा
रूपेरी पडद्यावरचा तारा

खुमासदार, बेधडक भाषाशैली
करारी होता त्यांचा बाणा
शब्दांना होती सत्याची धार
गोरगरीबांचा होता तो कणा

नाम फाऊंडेशन मधून
बळीराजाला उभे केले ताठ
आत्मविश्वास मनी रूजवूनी
दाखविली यशाची नवी वाट

साधी राहणी उच्च विचारसरणी
गाजविले अधिराज्य रसीक मनावर
भिजले नेत्र ओघळले अश्रु
मनामनात सर्वांच्या दाटे हुरहूर

हळव्या मनाचा नटसम्राट
मनामनात घर करून गेला
रांगडा व निर्भिड नाना
मृत्यूलाही ना कधी भ्याला




**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**



प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


## जीवन विकास ग्रंथालयाच्या वाचक व्यासपीठ उपक्रमात 'आठवणीतील पु.ल.'

**छत्रपती संभाजीनगर :** जीवन विकास ग्रंथालय' आयोजित वाचक व्यासपीठ या उपक्रमाच्या नवव्या साप्ताहिक बैठकीत आठवणीतील पु. ल. या विषयावर शुभम वाचक मंच विशेष सादरीकरण करणार आहे. हा कार्यक्रम म्हणजे मराठी साहित्यातील अनमोल रत्न पु. ल. देशपांडे यांच्या विविध आठवणी, किस्से व विनोदांची सुरेख पर्वणी असून दिनांक : १२ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता*ग्रंथमित्र भा. बा. आर्वीकर सभागृहात होणाऱ्या या खास कार्यक्रमास रसिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष: न्या. अंबादासराव जोशीकार्यवाह: डॉ. राजशेखर बालेकरकोषाध्यक्ष: नितीन कंधारकरसहकार्यवाह: नृसिंह कुलकर्णी यांनी केले आहे.


प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


## ५. शेवटी ती लाल केसवाली सापडलीच...

अबोलप्रीती - एक अनवट प्रेमकथा...

एक एक घोट शरबत समीर पित असतानाच रजनी परत आली. खुर्चीवर बसत तिने समीरला विचारले, “आवडले शर्करोदक ? अजून एक चषक पिणार ?”

समीरने आनन्दाने मान डोलावली. मग दासीने लगेच दुसऱ्या सुरईतील शरबत एक प्याल्यात ओतले. “हे शर्करोदक दुधाचे आहे.” दासीने प्याला समीरला देताना सांगितले.

रजनी त्याला म्हणाली, “आता थोड्याच वेळात आमची राजकुमारी येथे येईल तू आणलेल्या बांगड्या या मेजावर काढून ठेव.” समीरने सर्व बांगड्या व्यवस्थित मेजावर मांडून ठेवल्या व शरबताचा आस्वाद घेतला. रजनीनेही सगळ्या बांगड्या काळजीपूर्वक पाहिल्या आणि म्हणाली, “छान बांगड्या आहेत.” एवढ्यात आतून पैजणाचा रुऽम् झूऽम्, रुऽम् झूऽम्, रुऽम् झूऽम्, रुऽम् झूऽम् असा मंजूळ आवाज कानी आला. तशी दरवाजाकडे बघत रजनी म्हणाली, “हं, ते बघ आली आमची राजकुमारी.” दाराचा पडदा हलला आणि छान गुलाबी रंगाचे कपडे घातलेली राजकुमारी आपल्या मनमोहक चालीने जवळ येत होती. ती जणू काही ढगांमधून अलगद चालत आहे असे वाटत होते. ती मेजाजवळ आली व एका खुर्चीवर बसली. समीर राजकुमारीकडे बघतच राहिला. राजकुमारी अतिशय सुन्दरच होती. तिने डोक्याला गुलाबी रंगाचे रेशमी वस्त्र बांधले होते त्यामुळे तिचे केसच दिसत नव्हते. तिचे पातळ लाल चुटूक ओठ, मोत्यासारखे दात, निमुळती हनुवटी, चाफेकळी नाक, महिरपीसारखी जीवणी, गुलाबी गाल, गहिरे निळे डोळे, गोरी पान काया, इतकी गोरी की पान खाल्ले तर त्याचा रस घशातून खाली उतरताना दिसेल. समीरला विश्वासच बसत नव्हता की राजकुमारी आहे की एखादी परी ? समीर त्या आरसपानी सौंदर्याकडे पहातच राहिला... एवढ्यात रजनीने त्याच्या डोळ्यांपुढे बोटे नाचविली आणि सांगितले, “बांऽगड्याऽ बांऽऽगड्या, हं, दाखव बांऽऽऽगड्या.” समीर भानावर आला. त्याने लगेच एकेका बांगडीचे वैशिष्ट्य सांगायला सुरुवात केली. ‘ह्या सर्व बांगड्या केवळ आणि केवळ राजकुमारीसाठीच बनविल्या असल्याने त्यांची नक्षी परत कधीच दुसऱ्या कोणासाठीही वापरली जाणार नव्हती.’ असे त्याने राजकुमारीला सांगितले. त्याने राजकुमारीचे केस दिसतात का ते पाहिले. पण हाय रे... राजकुमारीने आपल्या डोक्याला वस्त्र बान्धले होते त्यामुळे तिचे केसच दिसत नव्हते. राजकुमारी जशी खुर्चीवर येऊन बसली तसा मनाला उल्हसित करणारा सुगन्धही येत होता. समीरच्या लक्षात आले की राजकुमारीने तिच्या वस्त्रांवर उंची अत्तर शिंपडले आहे, त्याचा सुगन्ध येत आहे. हा कोणत्या फुलाचा हा सुगन्ध आहे हे लक्षात येत नव्हते पण सुगन्ध तर खुपच छान होता.

समीर प्रत्येक बांगडीविषयी कलाकुसर, वैशिष्ट्ये, कोणता धातू, लाकूड, रत्ने वापरली आहेत हे आणि बरेच काही सांगत होता. राजकुमारी एकेक बांगडी हातात घेऊन बघत होती. हातात घालत होती. त्या दोघींचे बोलणे होत होते. राजकुमारीचा मंजुळ स्वर ऐकून समीर घायाळच झाला. राजकुमारीच्या साध्या साध्या हालचालीही त्याला घायाळ करत होती. तिचे नाजुक हातवारे म्हणजे एक सुन्दर अप्सरा वीणेवरून बोटेच फिरवत आहे असे वाटत होते. एवढ्यात एक बांगडी राजकुमारीच्या हातून खाली गालीच्यावर पडली. ती बांगडी उचलण्यासाठी राजकुमारी खाली वाकली, खाली वाकली तशी तिची एक बट हळूच रेशमी वस्त्रातून बाहेर आली. समीरने लगेचच त्या बाहेर आलेल्या बटेकडे पाहिले, पाहतो तर काय.... ती बट लाल होती. त्याचा विश्वासच बसेना, त्याने त्या क्षणी आपले भान राखले आणि परत खात्री करून घेतली. होय, ती लाल रंगाच्या केसांचीच बट होती.

राजकुमारीने ती बांगडी उचलली आणि बाहेर आलेली बट पुन्हा आपल्या कानामागे सारली. पण हे करत असताना तिचे डोक्यावरचे लाल केस समीरला दिसलेच. समीर जागेवर उडालाच... त्याची एवढ्या दिवसांची मेहनत आणि प्रतिक्षा आज फळाला आली होती. त्याच्या लक्षात आले की याच राजकुमारीचे केस त्या द्रोणातून आले होते. आणि माझा होरा खरा होता तर... ते केस नक्कीच कोणा एका महिलेचे असतील, पण ते केस थेट सारसनगरच्या राजकुमारीचे असतील... ? याची कल्पनाच केली नव्हती.

राजकुमारीला सगळ्याच बांगड्या पसंत पडल्या. तिला कोणती घेऊ आणि कोणती नको असे झाले. म्हणून तिने आणलेल्या सर्वच बांगड्या घेतल्या. समीरला राजकुमारीने विचारले, “या सर्व बांगड्यांचे मूल्य काय ?” यावर समीर उत्तरला, “या बांगड्या जिच्या हातात जाणार आहेत, तिच्यापुढे या बांगड्यांचे काहीच मोल नाही. पण या बांगड्या बनवून घेण्यासाठी मला जो खर्च आला तेवढाच मला हवा आहे, तो खर्च मात्र दोन सहस्त्र सुवर्ण मुद्रा एवढा आहे.” समीर सुगन्धाच्या प्रेमातच पडला होता. राजकुमारीला विश्वास बसेना की एवढ्या सुन्दर, आकर्षक चांगल्या बांगड्या फक्त दोन सहस्त्र सुवर्ण मुद्रा एवढ्या स्वस्त किंमतीत ! तिने पुन्हा विचारले, “सांगण्यात काही गडबड तर नाही ना ? बरोबर सांगत आहेस ना ?”

“तुझ्यासारख्या राजकुमारीने माझ्यासारख्या सामान्य बांगडीवाल्याकडून बांगड्या घ्याव्यात हेच माझ्यासाठी खूप आहे. मी फक्त माझा झालेला खर्च घेत आहे...” समीरचा खरा उद्देश आता सफल झाला होता. त्याला कुठे बांगडी विकून खूप नफा मिळवायचा होता ? आता समीर पुरता राजकुमारीच्या प्रेमातच पडला होता आणि प्रेमामध्ये कसला आला नफा ?

“ठिक आहे तर तुला तुझ्या दोन सहस्त्र सुवर्ण मुद्रा दिल्या जातील.” स्मित हास्य करीत मोठ्या आनन्दाने सुगन्धा उत्तरली. दोन तीन टाळ्या वाजवीज “एऽऽ कोण आहे रे तिकडे ?” सुगन्धाने विचारले.

लगेच एक सेवक हजर झाला. त्या सेवकाला सुगन्धाने समीरला मुनीमजींकडे घेऊन जाण्यास सांगितले व दोन सहस्त्र सुवर्ण मुद्रा देण्याचे आदेश दिले.

ते दोन सहस्त्र सुवर्ण मुद्रा मिळाल्यापेक्षा त्याला लाल केसवाली मुलगी सापडली याचाच फार आनन्द झाला. ती दुसरी तिसरी कोणी नसून साक्षात राजकुमारी सुगन्धा आहे, विशेष म्हणजे त्या लाल केसवाल्या महिलेबाबत किती सुन्दर असेल याची कल्पना केली होती त्यापेक्षा कैक पटीने सुगन्धा सुन्दर होती. (क्रमशः)




**नाव : अनिकेत भालेराव.**
**पत्ता : १२, वासुदेवानंद, ६५१, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०.**
**विद्युत पत्र : aniket.bhalerao@rocketmail.com**
**भ्रमणध्वनी : ९४२२५०४६०८**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ११ ऑक्टोबर २०२६

## शिवाजी महाविद्यालयात 'मराठवाड्यातील बोली ' या विषयावर प्रकल्प लेखन कार्यशाळा संपन्न.

कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने बी.ए. तृतीय वर्ष, मराठी विषयाच्या (सत्र पाचवे) विद्यार्थ्यांसाठी ‘मराठवाड्यातील बोली भाषांचा अभ्यास ’ या विषयावर प्रकल्प लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा अत्यंत उत्साहात, शिस्तबद्ध आणि अभ्यासपूर्ण वातावरणात संपन्न झाली.कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी शुभेच्छा दिल्या.व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे आणि डॉ. रामचंद्र झाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेचे हे पहिलेच वर्ष असून दरवर्षी विद्यार्थ्यांना संशोधनाची गोडी लागावी म्हणून या कार्यशाळेचे आयोजन केले जाणार आहे.कार्यशाळेच्या प्रारंभी डॉ. शिवाजी हुसे यांनी प्रास्ताविकात या कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) नुसार आता विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना संशोधनाभिमुख (Research Oriented) करणे अपेक्षित आहे. बी.ए. तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असलेला प्रकल्प हा त्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे.ते म्हणाले, "मराठवाड्यातील बोली भाषा हा विषय निवडण्यामागे एक विशिष्ट भूमिका आहे. बोली भाषा ही केवळ बोलण्याची पद्धत नसून तो आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे, आपल्या मातीचा गंध आहे. आज जागतिकीकरणाच्या आणि प्रमाण भाषेच्या प्रभावामुळे आपल्या बोली भाषा झपाट्याने लोप पावत आहेत. आपल्या आजीच्या तोंडातील अनेक सुंदर शब्द आजच्या पिढीला माहिती नाहीत. ते शब्द काळाच्या पडद्याआड जाण्यापूर्वी त्यांचे संकलन करणे, त्यांचे जतन करणे हे आपले कर्तव्य आहे. म्हणूनच हा विषय निवडला आहे."डॉ. शिवाजी हुसे यांचे प्रकल्प लेखन पद्धतीवर सखोल मार्गदर्शन -पहिल्या सत्रात मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे यांनी प्रकल्प लेखनाची शास्त्रशुद्ध पद्धती अत्यंत सोप्या भाषेत आणि उदाहरणासह समजावून सांगितली.ते म्हणाले, "अनेक विद्यार्थ्यांचा एक गैरसमज असतो की, गुगलवरून माहिती कॉपी करून, ४० पाने झेरॉक्स काढून फाईल तयार करणे म्हणजे प्रकल्प. पण तो प्रकल्प ठरत नाही, तो निबंध होतो. खरा प्रकल्प तेव्हाच होतो, जेव्हा तुम्ही स्वतः क्षेत्रात जाता, लोकांना भेटता, त्यांच्या मुलाखती घेता."त्यांनी प्रकल्प लेखनाचे पाच प्रमुख टप्पे सांगितले :१. विषयाची निवड : विषय हा नेमका आणि छोटा असावा. उदा. ‘मराठवाड्यातील बोली’ हा खूप मोठा विषय झाला. त्याऐवजी ‘कन्नड तालुक्यातील शेतकरी वर्गाच्या बोलीतील शब्दांचा अभ्यास’ किंवा ‘माझ्या गावातील महिला वर्गाच्या बोलीतील म्हणी व वाक्प्रचार’ किंवा 'कन्नड तालुक्यातील भिल्लांची बोली ', कन्नड तालुक्यातील अहिराणी बोली ', कन्नड तालुक्यातील ठाकरांची बोली ' असा नेमका विषय निवडावा.२. उद्दिष्टे निश्चिती : हा अभ्यास मी का करत आहे? यातून काय साध्य होणार आहे? याची ४-५ उद्दिष्टे लिहावीत.३. प्रश्नावली / मुलाखत पत्रिका तयार करणे : क्षेत्रात जाण्यापूर्वी २०-२५ प्रश्नांची एक पत्रिका तयार करावी. उदा. शेतीची अवजारे कोणती? त्यांना तुम्ही काय म्हणता? स्वयंपाक घरातील भांड्यांना काय म्हणता?४. प्रत्यक्ष क्षेत्रीय कार्य (Field Work) :हा सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. गावातील ६० वर्षांवरील वयोवृद्ध शेतकरी, शेतमजूर, सुतार, लोहार, कुंभार, महिला यांच्या मुलाखती घ्याव्यात. त्यांच्या तोंडातील ‘इरला, पावशा, ढोरकी, व्हारं, टवळी, बुगडी, लय, बेस, हाव, नगं, मंग, इदं’ असे लोप पावत चाललेले देशज शब्द, ‘आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार’, ‘आयत्या बिळात नागोबा’ यांसारख्या म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, ओव्या, लोकगीते यांचे संकलन करावे. त्यासाठी मोबाईलवर रेकॉर्डिंग करावे.५. विश्लेषण आणि निष्कर्ष : गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण करून त्यावर स्वतःचे मत मांडणे. उदा. या शब्दांचा उगम कसा झाला? त्यावर उर्दूचा प्रभाव आहे का?बोली भाषा ही अशुद्ध नसून ती अधिक समृद्ध आणि अर्थवाही असते, हे त्यांनी अनेक उदाहरणे देऊन पटवून दिले. ‘इरला’ या एकाच शब्दात किती मोठा अर्थ सामावला आहे, हे त्यांनी सांगितले.डॉ. रामचंद्र झाडे यांचे बोली संवर्धनाविषयी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन -दुसऱ्या सत्रात डॉ. रामचंद्र झाडे यांनी ‘मराठवाडी बोलीचे भाषिक वैशिष्ट्ये आणि संवर्धनाची गरज’ या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण आणि डोळस मार्गदर्शन केले.ते म्हणाले, "मराठवाडा हा हैदराबादच्या निजामाच्या अमलाखाली होता. त्यामुळे येथील मराठीवर उर्दू, दख्खनी, कन्नड आणि तेलगू या भाषांचा मोठा प्रभाव पडलेला दिसतो. आपण सहजपणे ‘नक्षी, खिल्ली, शेरडी, नगारा, अत्तर’ असे अनेक उर्दू शब्द वापरतो. हीच आपल्या बोलीची गंमत आणि श्रीमंती आहे. ती एकाच वेळी चार-पाच संस्कृतींना जोडते.""छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली या आठ जिल्ह्यांच्या बोलीत कमालीचे वैविध्य आहे. नांदेडकडची बोली थेट तेलगूच्या जवळ जाते, तर संभाजीनगर-जालना पट्ट्यातील बोलीत अहिराणीची झलक दिसते. बीड-धाराशिव पट्ट्यातील बोलीत अतिशय गोडवा आणि लय आहे. कन्नड तालुक्याच्या सीमेवर तर खानदेशी आणि मराठवाडीचा सुंदर संगम दिसतो."आज प्रमाण भाषेच्या आणि इंग्रजीच्या आक्रमणामुळे बोली भाषांना ‘गावंढळ’ किंवा ‘अशुद्ध’ समजले जात आहे. शहरात शिकायला गेलेला तरुण आपल्या गावच्या बोलीत बोलायला लाजतो. हा भाषिक न्यूनगंड अत्यंत घातक आहे. तरुणांनी आपल्या बोलीचा न्यूनगंड न बाळगता अभिमान बाळगावा. कारण बोलीतच आपल्या मातीचा सुगंध आहे. पुढील ५० वर्षांनी हेच प्रकल्प या बोली भाषांचे संदर्भ ग्रंथ आणि ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून वापरले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यामुळे एकही शब्द स्वतःच्या मनाने न लिहिता, जे ऐकाल तेच लिहा, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.समारोप तिसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील शंका विचारल्या. प्रकल्पाची पृष्ठसंख्या किती असावी? हस्तलिखित असावा की टाईप केलेला? संदर्भ ग्रंथ सूची कशी लिहावी? मुलाखत देताना लोक टाळाटाळ करतात, तेव्हा काय करावे? यावर चर्चा झाली.या कार्यशाळेस बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या गावातील बोली भाषेचा प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार डॉ. रामचंद्र झाडे यांनी मानले.

**डॉ. शिवाजी हुसेप्रमुख,**
**मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्र,शिवाजी महाविद्यालय , कन्नड**

## तरुण मित्रांनो ऐका!

तरुण मित्रांनो ऐका सांगतो,
प्रेमात कशाला करता घात.
आई वडिलांचे प्रेम पाहून,
स्वतःच मनावर करावे मात. १

आई वडिलांच्या प्रेमापुढे,
आपले प्रेम नाही रे जास्त.
पटल्यास मित्रा माझे सांगणे,
जीवनात अवलंब करावे रास्त.२

प्रेम करतांना भरकटले तर,
आईवडिलांचे विचार करावे.
भविष्याचा विचार करूनी,
जीवनात सप्तरंग भरावे. ३

प्रेमात भरकटलं मन जरी,
प्रयत्न करूनच आवरावे.
आपल्या मनाला आपणच,
समजूत काढून सावरावे. ४

प्रेम म्हणजे सर्वस्व नाही,
स्वतःच्या मनाला सांगावे.
कधी कधी मित्रा प्रेमामध्ये,
मनाशी आपल्याच भांडावे. ५

प्रेमात समर्पण करतांना,
नको स्वार्थी भावनेला थारा.
नाहीतर होईल जीवनभर,
प्रेमात तुमच्या संकटांचा मारा.६

प्रेमात पडते मनावर भुरळ,
प्रेमाच्या असतात नाना तऱ्हा.
म्हणून म्हणतो तरुणांनो जरा,
प्रेमात पडतांना विचार करा. ७

भरकटले मन जरी प्रेमात,
स्वतः मनावर नियंत्रण ठेवा.
तेव्हाच करता येणार मित्रांनो,
आईवडिलांची निस्वार्थ सेवा. ८



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## आयुष्याच्या वाटेवर

आयुष्याच्या वाटेवर
खाच खळगे होतेच
काटेकुटे अन् दगडधोंडयासोबत

पण चालत राहिलो मी
थकलेल्या पावलांनी
अख्खं ऊन डोक्यावर घेऊन
काळजातल्या वेदना लपवत
हसत हसत
सावलीच्या शोधात..

काटेरी वाटेवर चालताना
फुलं ही भेटली
भर उन्हात पाऊस
भेटावा तशी..

अन् भयाण अंधारात
स्वप्नाचे दिवे उजळले
काटेरी वाटेवरही
चालण्याचे बळ आले



**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ११ ऑक्टोबर २०२६


## ॲथलेटिक्स स्पर्धेत बारवाले महाविद्यालयाचे घवघवीत यश; खेळाडूंची सेंट्रल झोन स्पर्धेसाठी निवड




**जालना :** पार्थ सैनिकी शाळा, खरपुडी येथे ६ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या जालना झोन आंतरमहाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धेत जालना येथील बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. विविध क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी पदकांची कमाई केली असून, त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या स्पर्धेत खेळाडू निखिल सदावर्ते याने २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला, तर लांब उडीमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच १०० बाय ४ मीटर रिले स्पर्धेतही त्याने द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या संघात महत्त्वपूर्ण योगदान दिले. खेळाडू वैष्णवी कांबळे हिने थाळीफेक प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून आपले क्रीडानैपुण्य सिद्ध केले. तसेच लांब उडीमध्ये द्वितीय क्रमांक पटकावत तिने दुहेरी यश संपादन केले. याशिवाय सुमित साळवे, हेमंत श्रीपाद आणि भगत उजेड यांनी रिले स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळविला. एस. जाधव याने तिहेरी उडी प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या यशात भर घातली. या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणारे हे खेळाडू आता ८ व ९ ऑक्टोबर रोजी वैजापूर येथे होणाऱ्या सेंट्रल झोन स्पर्धेत जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यामुळे आगामी स्पर्धेतही हे खेळाडू आपली उत्कृष्ट कामगिरी कायम राखून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.खेळाडूंनी मिळविलेल्या या यशाबद्दल प्र. प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांनी विजेत्या खेळाडूंचा सन्मान करून त्यांचे अभिनंदन केले. खेळाडूंनी मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या बळावर मिळविलेल्या या यशाचे त्यांनी कौतुक केले. तसेच आगामी स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यावेळी क्रीडा मार्गदर्शक डॉ. भिकुलाल सले, क्रीडा समितीचे सदस्य डॉ. रवींद्र शिंपी, डॉ. निशिकांत लोखंडे, प्रा. अभिषेक ढेंबरे आणि अनिल जाधव उपस्थित होते. खेळाडूंनी मिळविलेल्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेला नवी ऊर्जा मिळाली असून, आगामी स्पर्धांमध्येही खेळाडू उल्लेखनीय कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## बाळासाहेब पवार वाचनालयात 'यशाची अक्षरवाट' कार्यशाळा संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय आणि मराठवाडा साहित्य परिषद शाखा कन्नड तालुका यांच्या वतीने आयोजित अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त 'यशाची अक्षरवाट' कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेला विद्यार्थी आणि शिक्षकांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला.मराठी भाषेची गोडी वाढावी, मराठी व्याकरणाविषयीची भीती दूर व्हावी आणि विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, या उद्देशाने आज 'यशाची अक्षरवाट – दहावी मराठी कृतीपत्रिका मार्गदर्शन' या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून लाभलेले मा. द्वारकानाथ जोशी सर (मराठी भाषा अभ्यासक, छत्रपती संभाजीनगर) यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमसाठी व्यासपीठावर सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय आणि मराठवाडा साहित्य परिषद शाखा कन्नड तालुका याचे सचिव रामकृष्ण पवार, मराठवाडा साहित्य परिषद कन्नडचे सदस्य प्रा. विजय भोसले, जयश्री सोनार, हरिचंद्र शेवरे, अस्मिता कदम, सुनिल मोरे, सुनिता दापके आदींची उपस्थिती होती. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. मराठी भाषा, व्याकरण आणि कृतीपत्रिका सोडविताना येणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या मनातील भीती काही प्रमाणात दूर झाली. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होऊन मराठी विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक झाला.संजय त्रिभुवन यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यशाळेत इयत्ता दहावीचे विद्यार्थी व मराठी विषय शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

## विद्यापीठातील ऐतिहासिक सोनेरी महलाच्या संवर्धन व पुनर्स्थापना कार्याला विद्यार्थ्यांची शैक्षणिक भेट



**छत्रपती संभाजीनगर :** इतिहास, लिबरल आर्ट्स आणि पुरातत्त्वशास्त्र, मोडी व वस्तुसंग्रहालय या विषयाच्या विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वास्तूंचे महत्त्व, वास्तू संवर्धनाची प्रक्रिया आणि सांस्कृतिक वारशाच्या जतनाविषयी प्रत्यक्ष ज्ञान मिळावे, या उद्देशाने सोनेरी महल, छत्रपती संभाजीनगर येथे दि. ०९-१०-२०२६ रोजी विभागप्रमुख प्रा. डॉ. गीतांजली बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील भेटी दरम्यान राज्य पुरातत्व विभागाचे श्री. व्ही. पी. राठोड (विभागीय पर्यवेक्षक), श्री. दिगंबर कोठकर, श्री. नागेश करवंदे, श्री. अरुण कटारिया, श्री. नरसीलाल सैनी, श्री. राहुल खरात यांनी विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वास्तूंचे जतन, संवर्धन आणि पुनर्स्थापना ही प्रक्रिया प्रत्यक्षात कशी केले जाते याबाबतचे प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले. तसेच प्रा. डॉ. रवि गव्हांदे यांनी विभागातर्फे उपस्थित असलेल्या राज्य पुरातत्व विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांचे आभार मानले. या क्षेत्र भेटीसाठी प्रा. डॉ. बिना सेंगर, प्रा. अश्विनकुमार जोगदंड, डॉ. संजय पाईकराव, डॉ. महेश सरोदे, प्रा. प्रियदर्शन हटकर, प्रा. अक्षय मिरासदार, प्रा. नम्रता भोसले, प्रा. गुणज्ञ मगरे, श्री. दिनेश सूर्यवंशी यांनी सहकार्य केले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ११ ऑक्टोबर २०२६


## पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बेघर निवाऱ्यातील वृद्धांचे केले समुपदेशन



**नागपूर (डॉ. चंद्रशेखर पाटील) :** जागतिक बेघर दिनानिमित्त डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत नागपूर महानगरपालिकेद्वारे संचालित इंदोरा येथील बोधिसत्त्व बेघर निवारा व आपुलकी बेघर निवारा येथे सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले. या उपक्रमांतर्गत निवाऱ्यातील वृद्ध व दिव्यांग व्यक्तींशी संवाद साधून त्यांचे समुपदेशन करण्यात आले. तसेच त्यांच्यासाठी सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर करून फळे व कपड्यांचे वितरण करण्यात आले. यासोबतच या प्रकल्पांतर्गत बालनिराधार केंद्रातील मुलांनीही सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.वृद्धापकाळ हा मानवी जीवनातील अत्यंत संवेदनशील टप्पा असतो. या काळात व्यक्तीला शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक आधाराची अधिक गरज असते. मात्र, कुटुंबाचा आधार नसणे, नातेवाइकांकडून दुर्लक्ष होणे, आर्थिक असुरक्षितता, आरोग्याच्या समस्या आणि निवाऱ्याचा अभाव यांमुळे अनेक वृद्धांना बेघर निवाऱ्याचा आश्रय घ्यावा लागतो. काही वृद्धांना कौटुंबिक वाद, एकाकीपणा, सामाजिक उपेक्षा आणि बदलत्या कौटुंबिक व्यवस्थेमुळेही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.बेघर निवाऱ्यात राहणाऱ्या वृद्धांना केवळ अन्न, वस्त्र आणि निवारा यांचीच गरज नसते, तर त्यांना प्रेम, आपुलकी, सन्मान आणि भावनिक आधाराचीही आवश्यकता असते. वय वाढत असताना उद्भवणारे आजार, हालचालींवरील मर्यादा, दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून राहण्याची वेळ आणि भविष्यातील अनिश्चितता यांमुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. अनेकदा आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी किंवा मनातील दुःख सांगण्यासाठी विश्वासाचे नाते निर्माण होणे आवश्यक असते. अशा परिस्थितीत समुपदेशन, संवाद, मनोरंजनात्मक उपक्रम आणि सामाजिक सहभाग यांमुळे वृद्धांना मानसिक दिलासा मिळण्यास मदत होते.वृद्धांची सेवा ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून मानवी संवेदनशीलतेची कसोटी आहे, या भावनेतून महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी वृद्धांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांमुळे निवाऱ्यातील वातावरण आनंददायी झाले. फळे व कपड्यांच्या वितरणातून विद्यार्थ्यांनी सामाजिक सहकार्याचा संदेश दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वृद्धांप्रती आदर, सहानुभूती, सामाजिक जाणीव आणि सेवाभाव वृद्धिंगत होण्यास मदत झाली.या कार्यक्रमाला डॉ. सुशांत चिमणकर, डॉ. कमलाकर तागडे, डॉ. चंद्रशेखर पाटील, डॉ. मानसी पनपालीवार, डॉ. गायत्री कडवे, बेघर निवाऱ्याचे संचालक श्री. पराते, प्रीती इंदूरकर आणि श्री. अंडरशहारे उपस्थित होते.समाजातील वंचित, निराधार, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. त्यांच्या गरजा समजून घेणे, त्यांच्याशी संवाद साधणे आणि त्यांना भावनिक आधार देणे ही समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे. पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालयाच्या या उपक्रमातून शिक्षणासोबतच सामाजिक संवेदनशीलता आणि मानवी मूल्यांची जोपासना करण्याचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला.

## शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे प्रकल्प लेखन कार्यशाळा उत्साहात संपन्न




**कन्नड (प्रतिनिधी) :** येथील शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने बी.ए. तृतीय वर्ष (मराठी), सत्र पाचवे च्या विद्यार्थ्यांसाठी 'मराठवाड्यातील बोली भाषांचा अभ्यास' या विषयावर एक दिवसीय प्रकल्प लेखन कार्यशाळेचे (ता. १० ) आयोजन करण्यात आले होते.कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य होते. याप्रसंगी व्यासपीठावर मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, ज्येष्ठ साहित्य अभ्यासक डॉ. रामचंद्र झाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. शिवाजी हुसे म्हणाले की, प्रकल्प लेखन म्हणजे केवळ ग्रंथातील माहितीचे संकलन नव्हे, तर प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन केलेले संशोधन आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या गावात, आपल्या घरात बोलल्या जाणाऱ्या बोली भाषेचा अभ्यास करावा. आजी-आजोबांच्या मुलाखती घ्याव्यात, त्यांच्या तोंडातील लोप पावत चाललेले देशज शब्द, म्हणी, वाक्प्रचार, लोकगीते यांचे संकलन करावे. हाच खरा भाषिक ठेवा आहे. त्यांनी प्रकल्पाची प्रस्तावना, उद्दिष्टे, संशोधन पद्धती, अनुक्रमणिका, विश्लेषण आणि समारोप कसा लिहावा याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.डॉ. रामचंद्र झाडे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, मराठवाडा हा पूर्वी हैदराबाद संस्थानाचा भाग असल्यामुळे येथील बोलीवर उर्दू, दखनी, कन्नड, तेलगू भाषांचा प्रभाव दिसतो. संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना या प्रत्येक जिल्ह्याच्या बोलीत वेगळेपण आहे. या बोली भाषांचे जतन करणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी लिहिलेले प्रकल्प हे केवळ गुणांसाठी नसून ते पुढील पिढीसाठी संदर्भ ग्रंथ ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी शुभेच्छा दिल्या.या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील शंका विचारल्या व त्यांचे निरसन करण्यात आले. या कार्यशाळेस बी.ए. तृतीय विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले, सूत्रसंचालन व आभार डॉ. रामचंद्र झाडे यांनी मानले.

## शिवाजी महाविद्यालयात मानसिक आरोग्य दिनानिमित्त विविध उपक्रम

**कन्नड :** शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड येथील मानसशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त मानसिक आरोग्य जनजागृतीसाठी एकदिवसीय कार्यशाळा आणि निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, मानसिक समस्यांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची वृत्ती विकसित करणे आणि मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देणे हा या उपक्रमांचा प्रमुख उद्देश होता.कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. शिवाजी हुसे , डॉ. सुनील गोरडे, डॉ. जगदीश भेलोंडे, डॉ. रामचंद्र झाडे,प्रा. सोमेश्वर मोगरे आणि डॉ. प्रकाश महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यशाळेच्या प्रारंभी विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्यविषयक जनजागृती करणारा लघुपट दाखविण्यात आला. त्यानंतर मानसशास्त्रीय संवाद व समुपदेशन सत्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्याचे महत्त्व, मानसिक तणावाचे व्यवस्थापन, भावनिक संतुलन आणि मानसिक समस्यांबाबत योग्य वेळी मार्गदर्शन घेण्याची आवश्यकता याविषयी माहिती देण्यात आली.याच उपक्रमाचा एक भाग म्हणून मानसशास्त्र विभागाच्या वतीने 'मानसिक आरोग्य जनजागृती' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत एकूण ४५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धेत प्रथम पारितोषिक कार्तिक मोटे, द्वितीय पारितोषिक नेहा उघडे , तृतीय पारितोषिक सुरेखा उघडे आणि उत्तेजनार्थ पारितोषिक सुंदरा मधे यांना प्रदान करण्यात आले.मानसिक आरोग्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे, मानसिक समस्यांबाबत असलेले गैरसमज दूर करणे आणि मानसिक आरोग्याविषयी समाजात सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे या दृष्टीने हे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरले.कार्यशाळेचे संचलन मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र घोती यांनी केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हे दोन्ही उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ११ ऑक्टोबर २०२६

# मुलींच्या स्वप्नांना मिळू द्या समानतेचे आकाश - सुजाता मोरे

प्रत्येक मुलीच्या डोळ्यांत स्वतःचे आयुष्य घडविण्याचे, शिक्षण घेण्याचे, स्वावलंबी होण्याचे आणि समाजात सन्मानाने जगण्याचे स्वप्न असते. कोणाला डॉक्टर, शिक्षिका, प्राध्यापिका, अधिकारी, संशोधक, मार्गदर्शक किंवा उद्योजिका व्हायचे असते, तर कोणाला आपल्या कर्तृत्वातून समाजपरिवर्तन घडवायचे असते. या स्वप्नांना आकार देण्यासाठी शिक्षणाबरोबरच सुरक्षितता, समान संधी आणि आत्मसन्मान आवश्यक असतो. आज मुलींनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली असली, तरी त्यांच्या वाट्याला भेदभाव, अपमान आणि दुय्यम वागणूक येत असल्याचे वास्तव नाकारता येत नाही. मुलींच्या संरक्षणासाठी कायदे अस्तित्वात असतानाही कामाच्या ठिकाणी त्यांच्या क्षमतेवर शंका घेणे, कामाचे श्रेय नाकारणे, प्रगतीच्या संधींपासून दूर ठेवणे आणि अपमानास्पद टिप्पणी करणे असे प्रकार घडतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा केवळ मुलींच्या यशाचा गौरव करण्याचा दिवस नसून त्यांच्या हक्कांचा, सुरक्षिततेचा आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचा विचार करण्याची संधी आहे.संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने २०११ मध्ये ११ ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय बालिका दिन म्हणून घोषित केला. मुलींचे हक्क, त्यांच्यासमोरील आव्हाने आणि त्यांना उपलब्ध करून द्यावयाच्या संधी यांविषयी जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. मुलींचे शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षितता, बालविवाहाचे निर्मूलन आणि निर्णयप्रक्रियेतील सहभाग यांना या दिनानिमित्त महत्त्व दिले जाते. मात्र, बालिकेच्या हक्कांचा विचार केवळ तिच्या बालपणापुरता मर्यादित ठेवता येत नाही. बालपणी कुटुंबात मिळणारी वागणूक, शिक्षणाविषयीची भूमिका आणि स्वातंत्र्याबाबतचे सामाजिक संकेत यांचा परिणाम तिच्या पुढील आयुष्यावर होतो. म्हणून मुलीला सुरक्षित बालपण देण्याबरोबरच प्रौढ झाल्यावर शिक्षण, रोजगार आणि सार्वजनिक जीवनात सन्मानाने सहभागी होण्याची संधी देणेही आवश्यक आहे.भारतीय समाजात मुलींनी शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, क्रीडा, उद्योग, पर्यटन आणि सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. ग्रामीण भागातील अनेक मुली प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करतात, घरातील जबाबदाऱ्या सांभाळतात आणि आर्थिक स्वावलंबन मिळविण्यासाठी प्रयत्न करतात. तरीही मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव अनेक कुटुंबांत आणि सामाजिक संस्थांमध्ये टिकून आहे. मुलाच्या महत्त्वाकांक्षेला प्रोत्साहन दिले जाते, तर मुलीच्या आकांक्षांना सुरक्षिततेच्या किंवा कौटुंबिक प्रतिष्ठेच्या नावाखाली मर्यादा घातल्या जातात. मुलीने कोणते शिक्षण घ्यावे, कुठे नोकरी करावी आणि किती स्वतंत्रपणे निर्णय घ्यावेत, यावर अनावश्यक बंधने लादली जातात. समानतेचा अर्थ मुलींना केवळ शिक्षणाची परवानगी देणे नव्हे, तर त्यांना स्वतःचे निर्णय घेण्याचा अधिकार आणि त्या निर्णयांचा आदर मिळवून देणे हा आहे.कामाच्या ठिकाणी प्रवेश केल्यानंतर भेदभाव अधिक सूक्ष्म स्वरूपात दिसून येऊ शकतो. एखाद्या तरुणीने चांगले शिक्षण घेतले, आवश्यक कौशल्ये आत्मसात केली किंवा स्पर्धा परीक्षेत यश मिळविले, तरी तिच्या कामाचे मूल्यमापन गुणवत्तेऐवजी लिंगाच्या आधारावर होऊ शकते. बैठकीत तिने मांडलेल्या सूचनेकडे दुर्लक्ष करणे, तिचे म्हणणे मध्येच तोडणे, तिच्या कल्पनेचे श्रेय दुसऱ्याला देणे किंवा महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांपासून दूर ठेवणे, ही भेदभावाची उदाहरणे आहेत. काही ठिकाणी महिलांना नेतृत्वासाठी योग्य समजले जात नाही. विवाह किंवा मातृत्वामुळे त्यांची कार्यक्षमता कमी होईल, असे कोणताही ठोस आधार नसताना गृहीत धरले जाते. समान पात्रता आणि कामगिरी असूनही वेतन, बढती, प्रशिक्षण आणि निर्णयप्रक्रियेतील सहभागाच्या संधींमध्ये तफावत दिसू शकते. या वर्तनामुळे महिलांच्या कष्टांचे अवमूल्यन होते आणि त्यांच्या प्रगतीच्या मार्गात अडथळे निर्माण होतात.अपमानास्पद आणि हीन वागणूक हीदेखील भेदभावाची गंभीर बाजू आहे. सहकाऱ्यांसमोर एखाद्या मुलीला कमी लेखणे, तिच्या दिसण्यावर टिप्पणी करणे, तिच्या बुद्धिमत्तेची खिल्ली उडवणे, तिच्या मताला भावनिक ठरवून नाकारणे किंवा तिच्या यशामागे दुसऱ्याच व्यक्तीचा हात असल्याचे सांगणे, यामुळे तिच्या आत्मसन्मानाला धक्का पोहोचतो. काही वेळा अशा वर्तनाला विनोदाचे स्वरूप दिले जाते. परंतु विनोदाच्या नावाखाली वारंवार होणारा अपमान संबंधित व्यक्तीच्या मनावर खोल परिणाम करू शकतो. सतत अशा अनुभवांना सामोरे जावे लागल्यास ती स्वतःचे मत मांडण्यास कचरू शकते, नवीन जबाबदारी स्वीकारण्यास घाबरू शकते किंवा नोकरी सोडण्याचा निर्णय घेऊ शकते. त्यामुळे कामाच्या ठिकाणी होणारा भेदभाव हा केवळ वैयक्तिक संवेदनशीलतेचा प्रश्न नसून मानवी प्रतिष्ठा, समान हक्क आणि संस्थात्मक न्यायाशी संबंधित आहे.मुलींच्या सुरक्षेसाठी कायदे असणे ही महत्त्वाची बाब आहे; परंतु कायद्याची तरतूद आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांमध्ये अंतर राहिले, तर संरक्षणाचा उद्देश पूर्ण होत नाही. भारतीय संविधानातील समानतेचा अधिकार आणि लिंगाच्या आधारावर भेदभावास मनाई करणाऱ्या तरतुदी महिलांच्या हक्कांसाठी महत्त्वाच्या आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ रोखण्यासाठी आणि त्यासंबंधी तक्रारींचे निवारण करण्यासाठी ‘कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३’ अस्तित्वात आहे. या कायद्याचा उद्देश महिलांसाठी सुरक्षित कार्यपरिसर निर्माण करणे हा आहे. कायद्यानुसार दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या पात्र संस्थांमध्ये अंतर्गत समिती स्थापन करण्याची तरतूद आहे. संबंधित अटींनुसार इतर प्रकरणांत जिल्हास्तरीय स्थानिक समितीमार्फत तक्रार निवारणाची व्यवस्था उपलब्ध असते. या व्यवस्थेची माहिती कर्मचाऱ्यांना देणे आणि तक्रारींची योग्य दखल घेणे महत्त्वाचे आहे.तथापि, प्रत्येक अपमानास्पद किंवा भेदभावपूर्ण वर्तन आपोआप लैंगिक छळाच्या कायदेशीर व्याख्येत येते असे नाही. घटनेचे स्वरूप, उपलब्ध पुरावे आणि लागू कायद्यातील अटी यांनुसार तिचे मूल्यमापन करावे लागते. तरीही एखादे वर्तन विशिष्ट कायद्याच्या कक्षेत बसत नाही म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. लिंगाधारित पूर्वग्रह, अन्यायकारक मूल्यमापन, अपमानकारक भाषा आणि संधी नाकारणे यांसारख्या बाबींवर संस्थांनी त्यांच्या अंतर्गत नियमांनुसार योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे. कायद्याचे पालन करणे ही किमान जबाबदारी आहे; प्रत्येक कर्मचाऱ्याला सन्मानाने वागविणे ही नैतिक आणि संस्थात्मक जबाबदारी आहे.कायद्यांची माहिती उपलब्ध असणे आणि त्यांचा उपयोग करण्याचे धैर्य असणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अनेक तरुणींना तक्रार कुठे करावी, कोणाशी संपर्क साधावा किंवा तक्रार केल्यानंतर आपली नोकरी आणि प्रतिष्ठा धोक्यात येईल का, याची चिंता असते. वरिष्ठ व्यक्तीविरुद्ध तक्रार करताना पदसत्तेचा दबाव, सहकाऱ्यांकडून मिळणारा अपुरा पाठिंबा आणि तक्रारीची माहिती इतरांपर्यंत पोहोचण्याची भीती त्यांना गप्प राहण्यास भाग पाडू शकते. काही वेळा अन्याय सहन करण्याचा सल्ला दिला जातो किंवा अनुचित वर्तनाला ‘थट्टा’ म्हणून दुर्लक्षित केले जाते. तक्रार करणाऱ्या व्यक्तीलाच दोष देण्याऐवजी तिचे म्हणणे निष्पक्षपणे ऐकणे, गोपनीयतेचे नियम पाळणे, न्याय्य चौकशी करणे आणि सूडबुद्धीने कारवाई होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.कामाच्या ठिकाणी समानतेचे वातावरण निर्माण करण्यासाठी संस्थांनी केवळ कायद्याचे फलक लावून किंवा समिती स्थापन करून थांबता कामा नये. तक्रार निवारणाची प्रक्रिया कर्मचाऱ्यांना सहज समजेल अशी असावी. नियमित जनजागृती, संवेदनशीलता प्रशिक्षण, पारदर्शक भरती व बढती प्रक्रिया आणि कामगिरीवर आधारित मूल्यमापन यांना प्राधान्य द्यावे. वरिष्ठ अधिकारी आणि व्यवस्थापकांनी आपल्या वर्तनातून आदर्श घालून द्यावा. सुरक्षिततेचा अर्थ केवळ शारीरिक छळापासून संरक्षण एवढाच नाही; तर कर्मचाऱ्यांना निर्भयपणे मत मांडता येणे, कौशल्य विकसित करता येणे, नवीन जबाबदाऱ्या स्वीकारता येणे आणि आपल्या कामाचे योग्य श्रेय मिळणे, हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. मुलींना सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण मिळाले, तर त्यांच्या क्षमतेचा उपयोग संस्था आणि समाजाच्या विकासासाठी अधिक प्रभावीपणे होऊ शकतो.शाळा, महाविद्यालये आणि कुटुंबे यांचीही या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका आहे. विद्यार्थ्यांना परस्परांचा आदर, लैंगिक समानता, संमती आणि मानवी प्रतिष्ठा यांचे शिक्षण मिळाले पाहिजे. मुलींना आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे उपयुक्त असले, तरी संपूर्ण जबाबदारी मुलींच्या खांद्यावर टाकणे योग्य नाही. मुलांनी आणि पुरुषांनीही भेदभावपूर्ण भाषा, अवमानकारक विनोद आणि छळवणुकीला विरोध केला पाहिजे. घरात मुलगा आणि मुलगी यांच्या शिक्षणासाठी समान प्रोत्साहन, घरकामाची न्याय्य विभागणी आणि निर्णयस्वातंत्र्याचा आदर दिसला, तर समानतेचे संस्कार अधिक दृढ होतील. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील मुलींना शिष्यवृत्ती, कौशल्यविकास, सुरक्षित वाहतूक आणि रोजगाराभिमुख मार्गदर्शन उपलब्ध करून देणेही आवश्यक आहे.आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा आपल्या सामाजिक वर्तनाचे आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे. आपण मुलींना स्वप्ने पाहण्यास प्रोत्साहन देतो; पण ती पूर्ण करण्यासाठी आवश्यक स्वातंत्र्य देतो का? त्यांच्या यशाचे कौतुक करतो; पण निर्णय घेण्याच्या अधिकारात समान भागीदारी देतो का? सुरक्षिततेची भाषा बोलतो; पण कामाच्या ठिकाणी होणाऱ्या अपमानाविरुद्ध ठामपणे उभे राहतो का? या प्रश्नांची उत्तरे आपल्या दैनंदिन वर्तनात शोधावी लागतील. मुलींच्या सुरक्षेसाठी कायदे आवश्यक आहेत; परंतु त्याबरोबर संवेदनशील समाज, जबाबदार संस्था, सजग सहकारी आणि भेदभाव नाकारणारी मानसिकता असणेही तितकेच गरजेचे आहे.मुलींच्या स्वप्नांना समानतेचे आकाश देणे म्हणजे त्यांच्यासाठी वेगळे आकाश निर्माण करणे नव्हे, तर आधीपासून असलेल्या आकाशात त्यांनाही समान हक्काने उडण्याची संधी देणे होय. मुलगी ही केवळ कोणाची तरी मुलगी, बहीण, पत्नी किंवा आई म्हणून नव्हे, तर स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आणि समान हक्क असलेली नागरिक म्हणून स्वीकारली गेली पाहिजे. तिचे मूल्य तिच्या लिंगावर नव्हे, तर तिच्या ज्ञानावर, कौशल्यावर आणि योगदानावर ठरले पाहिजे. आंतरराष्ट्रीय बालिका दिनाच्या निमित्ताने प्रत्येक घराने, शैक्षणिक संस्थेने, कार्यालयाने आणि समाजाने असा संकल्प करावा की मुलींना केवळ सुरक्षित जग नव्हे, तर सन्मानाने जगता येईल असे वातावरण मिळेल. कारण मुलींच्या स्वप्नांना पंख देणे ही केवळ त्यांची वैयक्तिक गरज नाही; ती समताधिष्ठित, न्याय्य आणि प्रगत समाजाच्या निर्मितीसाठीची अपरिहार्य अट आहे.



**सुजाता मोरे, (लेखिका, पर्यटन प्रशासनशास्त्राच्या अभ्यासक आहेत)**
**ईमेल —**
**sujata.more2103@gmail.com**

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ११ ऑक्टोबर २०२६

# उच्च शिक्षणातील संस्थात्मक भेदभाव आणि जातविरोधी विचारांचे प्रभावी माध्यम : ‘जयंती २’

चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते समकालीन समाजाची वैचारिक मूल्ये घडविणारे, प्रस्थापित समजुतींना आव्हान देणारे आणि जनमानसाला दिशा देणारे एक अत्यंत जबाबदार सांस्कृतिक माध्यम आहे. मराठी चित्रपटसृष्टीला सामाजिक प्रश्नांची मांडणी करणाऱ्या चित्रपटांची एक प्रदीर्घ व समृद्ध परंपरा लाभली आहे. मात्र, जात, आरक्षण, उच्च शिक्षण व्यवस्था, वंचित विद्यार्थ्यांचे अस्तित्वसंघर्ष, संस्थात्मक भेदभाव आणि संविधानाने बहाल केलेले समतेचे हक्क या सर्व गुंतागुंतीच्या प्रश्नांना एकाच वैचारिक सूत्रात गुंफून मांडणारा ‘जयंती २’ हा चित्रपट समकालीन मराठी व भारतीय चित्रपटसृष्टीत एक अत्यंत मैलाचा दगड ठरतो. सप्टेंबर २०२६ मध्ये प्रदर्शित झालेला हा चित्रपट शैलेश बळीराम नरवाडे यांच्या कसदार लेखन-दिग्दर्शनातून साकारला आहे. आधुनिकता, वाढते नागरीकरण, औद्योगिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे आपला समाज पुरोगामी व समतावादी झाला आहे, असा एक सर्वसामान्य भाबडा समज आधुनिक समाजात पसरलेला दिसतो. परंतु तंत्रज्ञानाची किंवा बाह्य साधनांची आधुनिकता अंगीकारणे म्हणजे माणसांच्या मनातील खोलवर रुजलेली सरंजामी व जातीय मानसिकता संपुष्टात येणे नव्हे, हे कटू सत्य हा चित्रपट अत्यंत निर्भीडपणे उघडे पाडतो. ‘जयंती २’ची सर्वात मोठी जमेची बाजू ही की, तो जातीय विषमतेला केवळ पारंपारिक ग्रामीण रचनेपुरती किंवा गावकुसाबाहेरच्या मर्यादेत बंदिस्त ठेवत नाही; तर विद्यापीठे, महाविद्यालये आणि संशोधन संस्था यांसारख्या आधुनिक, प्रगत आणि तथाकथित ‘सभ्य’ अवकाशामध्येही जातीचे अदृश्य पाश कसे कार्यरत असतात, याचे समाजशास्त्रीय विश्लेषण करतो. भारतीय समाजरचनेमध्ये जात ही केवळ एक वैयक्तिक ओळख नसून ती सत्ता, संसाधने, सामाजिक प्रतिष्ठा, शिक्षणाच्या संधी आणि मानवी संबंधांचे वितरण नियंत्रित करणारी एक ऐतिहासिक आणि संरचनात्मक संस्था आहे, हे वास्तव चित्रपट केंद्रस्थानी आणतो. तंत्र भारताने आपल्या संविधानाच्या माध्यमातून लोकशाही, सार्वत्रिक प्रौढ मतदान, शिक्षणाचा विस्तार आणि सकारात्मक कृती म्हणून आरक्षणाची तरतूद करून शतकानुशतके चालत आलेली विषमता दूर करण्याचा मूलभूत प्रयत्न केला. कागदावर आणि कायद्याच्या पुस्तकात सर्वांना समान संधीची हमी देण्यात आली. तथापि, संविधानातील ‘कायदेशीर समानता’ आणि जमिनीवरील ‘प्रत्यक्ष सामाजिक समानता’ यांमध्ये आजही प्रचंड दरी आहे. गेल्या काही दशकांत मंडल आयोग, आरक्षण धोरणे आणि सामाजिक प्रबोधनामुळे उच्च शिक्षण संस्थांमध्ये दलित, आदिवासी आणि बहुजन समूहांचा प्रवेश निश्चितच वाढला आहे. परंतु, संस्थांच्या आवारात केवळ ‘प्रवेश मिळणे’ म्हणजे तिथे ‘सन्मान, सुरक्षितता आणि समान वागणूक मिळणे’ नव्हे, हा मूलभूत विरोधाभास ‘जयंती २’ अत्यंत परिणामकारकरीत्या अधोरेखित करतो. चंद्रपूरच्या ग्रामीण व दुर्गम आदिवासी भागातून पुण्याच्या नामांकित महाविद्यालयात उच्च शिक्षणाचे स्वप्न घेऊन दाखल होणाऱ्या पायल मरकाम या विद्यार्थिनीच्या संघर्षातून चित्रपटाचे कथानक आकार घेते. तिच्यासाठी महाविद्यालय म्हणजे स्वतःच्या कुटुंबाला आणि पिढ्यांना दारिद्र्य व बहिष्काराच्या अंधारातून बाहेर काढणारी एक पवित्र ज्ञानभूमी असते. मात्र, प्रत्यक्षात महाविद्यालयात पाऊल ठेवताच तिला ज्या विदारक वास्तवाला सामोरे जावे लागते, ते पाहून अनेक मूलभूत प्रश्न निर्माण होतात: विद्यापीठ आणि महाविद्यालये हे खरोखरच समताधिष्ठित आणि निष्पक्ष अवकाश आहेत का? विद्यार्थ्यांची सामाजिक आणि जातीय पार्श्वभूमी त्यांच्या विद्यापीठीय अनुभवांना, मैत्रीला आणि यशाला मर्यादित करते का? उच्च शिक्षण व्यवस्थेत मिरवली जाणारी ‘मेरिट’ (गुणवत्ता) ही संकल्पना सामाजिक विषमतेपासून खरोखरच अलिप्त आहे का? आरक्षण केवळ संस्थांचे दरवाजे उघडू शकते; परंतु त्या दरवाजातून आत आल्यानंतर त्या व्यक्तीला सन्मानाने ताठ मानेने जगता येईल असे पोषक वातावरण कोण आणि कसे निर्माण करणार? या सर्व प्रश्नांमुळे ‘जयंती २’चे परीक्षण केवळ एका कलाकृतीपुरते मर्यादित न राहता, उच्च शिक्षण क्षेत्रातील संस्थात्मक जातवास्तव आणि आंबेडकरवादी सामाजिक न्यायाच्या समाजशास्त्रीय अभ्यासाचा एक दस्तऐवज ठरते. चित्रपटाची कथा पुण्याच्या शैक्षणिक परिघात घडते. आदिवासी विद्यार्थिनी पायल मरकामवर महाविद्यालयातील सवर्ण आणि उच्चभ्रू विद्यार्थ्यांकडून रॅगिंगच्या नावाखाली जातीय शेरेबाजी आणि मानसिक छळ केला जातो. जेव्हा स्वाभिमानी पायल या अन्यायाविरुद्ध मूग गिळून गप्प बसण्याऐवजी जाब विचारते, तेव्हा व्यवस्थेचा खरा चेहरा उघडा पडतो. तिच्या तक्रारीची निष्पक्ष चौकशी करून तिला न्याय देण्याऐवजी, उलट तिच्यावरच बेशिस्तीचा ठपका ठेवून तिला निलंबित केले जाते. यानंतर या प्रकरणाची चौकशी प्रा. गिरिजा देशपांडे यांच्याकडे सोपवली जाते. इथून चित्रपटाचा प्रवास एका वैयक्तिक समस्येकडून संस्थात्मक रचनेच्या चिकित्सेकडे वळतो. भारतात जात ही आता जुन्या रूपात उरलेली नाही; ती आज आधुनिक संस्थांमध्ये सूक्ष्म (subtle) आणि अदृश्य रूपाने कार्यरत असते. जात ही केवळ गावातील विहिरीवर किंवा वस्तीत अडकून राहत नाही, तर ती विद्यार्थ्यांच्या आडनावातून, त्याच्या भाषेतील उच्चारांवरून, राहणीमानातून, पेहरावातून, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वावरून आणि अनौपचारिक मैत्रीच्या वर्तुळातून विद्यापीठाच्या वर्गात प्रवेश करते. समाजशास्त्रीय विश्लेषणाच्या आधारे पाहिल्यास येथे भेदभावाचे दोन स्पष्ट स्तर आढळतात: **व्यक्तिगत भेदभाव** : एका विद्यार्थ्याने दुसऱ्या विद्यार्थ्याची सामाजिक, प्रादेशिक किंवा वांशिक ओळख वापरून त्याला हीन लेखणे, त्याची खिल्ली उडवणे आणित्याला तुच्छ वागणूक देणे. **संस्थात्मक भेदभाव** : शैक्षणिक संस्थेची प्रशासकीय नियमावली, प्राध्यापकांचा दृष्टिकोन, तक्रार निवारण समित्यांचे पक्षपाती वर्तन आणि एकूणच संस्कृती यांद्वारे विशिष्ट सामाजिक समूहाच्या विद्यार्थ्यांना सातत्याने बहिष्कृत, असुरक्षित आणि दुय्यम वाटायला लावणे. पायलची कथा या दोन्ही पातळ्यांना भेदून जाते. उच्च शिक्षणामध्ये केवळ ‘ॲडमिशन’ मिळणे म्हणजे समता प्रस्थापित होणे नव्हे; तर प्रवेशानंतर सुरक्षिततेची हमी, समान प्रतिष्ठा, सहभाग आणि संस्थात्मक निर्णयप्रक्रियेत न्याय्य वाटा मिळणे ही सामाजिक न्यायाची अपरिहार्य पायरी आहे. महाविद्यालयांमधील रॅगिंगकडे अनेकदा ‘वरिष्ठ-कनिष्ठ विद्यार्थ्यांमधील संवाद’, ‘परंपरा’ किंवा ‘गंभीर नसलेली मस्करी’ अशा हलक्याफुलक्या दृष्टीने पाहिले जाते. परंतु ‘जयंती २’ रॅगिंगच्या या बाह्य आवरणामागील सत्तासंबंधांचे अत्यंत विदारक रूप उलगडून दाखवतो. जेव्हा रॅगिंगमध्ये एखाद्या विद्यार्थ्याची जात, त्याची आदिवासी पार्श्वभूमी किंवा आरक्षणाचा उल्लेख करून त्याला लक्ष्य केले जाते, तेव्हा ते साधे खोडकर वर्तन राहत नाही; ते थेट तकानुशतके चालत आलेल्या सामाजिक वर्चस्वाचे आणि सरंजामी उद्दामपणाचे उघड प्रदर्शन बनते. अशा ठिकाणी समाजशास्त्रीयदृष्ट्या सत्तेची समीकरणे अत्यंत महत्त्वाची ठरतात: संस्थेत कोणाला आवाज उठवण्याचा आणि जाब विचारण्याचा जन्मसिद्ध हक्क वाटतो? कोणाला ‘शांत राहा आणि जुळवून घ्या’ असा दबाव आणून गप्प केले जाते? व्यवस्थेच्या नजरेत कोणाचा शब्द विश्वासार्ह मानला जातो आणि कोणाच्या तक्रारीला ‘उगाच कांगावा करणे’ म्हणून फेटाळले जाते? हे प्रश्न सिद्ध करतात की, शिक्षण संस्थांमधील रॅगिंग ही अनेकदा जातवर्चस्व अबाधित राखण्याची एक अनधिकृत संस्थात्मक हत्यार म्हणून वापरली जाते. चित्रपटातील अत्यंत अस्वस्थ करणारा भाग म्हणजे अन्यायाविरुद्ध वाचा फोडल्यानंतर स्वतः पायललाच ज्या संस्थात्मक चक्रव्यूहाचा सामना करावा लागतो, तो प्रसंग होय. भारतीय शिक्षण संस्थांमध्ये आणि समाजात अन्याय घडल्यानंतर एक ठरलेली प्रतिक्रिया उमटते: *“विषय वाढवू नका, संस्थेचे नाव खराब होईल.” “आपसात समजूत काढून घ्या, तिचेच शैक्षणिक नुकसान होईल.” “थोडं सहन करायला शिकलं पाहिजे, तडजोड हाच मार्ग आहे.”* वरवर पाहता हे सल्ले शांतता राखण्यासाठी दिलेले वाटतात; परंतु समाजशास्त्रीय परिभाषेत हा **‘पीडितालाच दोषी ठरविण्याचा’** प्रकार आहे. मूळ प्रश्न असतो—‘संस्थेत जातीय भेदभाव का झाला आणि तो कुणी केला?’ मात्र व्यवस्थेकडून पद्धतशीरपणे हा प्रश्न बदलून ‘तिने आवाज का उठवला आणि तक्रार करून संस्थेची बदनामी का केली?’ असा केला जातो. म्हणजेच, अन्यायाची नैतिक व कायदेशीर जबाबदारी गुन्हेगारांवरून थेट पीडित व्यक्तीवर ढकलली जाते. संस्थेची प्रतिष्ठा ही तक्रारी दाबून ठेवण्यात किंवा त्या दडपण्यात नसते; तर तक्रार आल्यानंतर ती संस्था किती पारदर्शक, निर्भय आणि न्याय्य पद्धतीने सत्य समोर आणते, यात त्या संस्थेचे लोकशाही चारित्र्य दिसून येते. जर स्वतःची तथाकथित पत वाचवण्यासाठी एका असहाय्य विद्यार्थिनीचा गळा घोटला जात असेल, तर ती संस्था ज्ञानमंदिर न राहता अन्यायाची छावणी बनते. विद्यापीठ ही केवळ पदव्या देणारी कारखाने नसून ती संविधानाने अभिप्रेत असलेल्या लोकशाही मूल्यांचे, नागरिकत्वाचे आणि मानवी मूल्यांचे संस्कार करणारी केंद्रे आहेत. ‘जयंती २’चा वैचारिक पाया हा पूर्णपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानावर आधारलेला आहे. बाबासाहेबांनी संविधान सभेतील आपल्या ऐतिहासिक भाषणात स्पष्ट बजावले होते की, “आपण केवळ राजकीय लोकशाही निर्माण करून समाधान मानू शकत नाही; जोपर्यंत ही राजकीय लोकशाही ‘सामाजिक लोकशाही’मध्ये रूपांतरित होत नाही, तोपर्यंत तिला कोणताही शाश्वत आधार असणार नाही.” स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये दैनंदिन सामाजिक व्यवहारात उतरल्याशिवाय लोकशाही अर्थहीन ठरते. पायल मरकामचा लढा याच संघर्षाचे प्रतिनिधित्व करतो. तिला महाविद्यालयात प्रवेश मिळाला—ही झाली केवळ कायदेशीर आणि तांत्रिक समतेची पूर्तता. परंतु महाविद्यालयाच्या आवारात तिला सन्मान, सुरक्षितता आणि बंधुतेची वागणूक मिळाली नाही—हा आहे सामाजिक लोकशाहीचा पराभव. बाबासाहेबांच्या विचारसरणीत शिक्षण हे केवळ पोटापाण्याचे किंवा नोकरी मिळवण्याचे साधन कधीच नव्हते; तर ते मानवी आत्मभान, स्वाभिमान आणि सामाजिक परिवर्तनाचे क्रांतीकारक माध्यम होते. वंचित घटकातील एखादी मुलगी जेव्हा उच्च शिक्षण संस्थेत पाऊल ठेवते, तेव्हा तो केवळ तिचा वैयक्तिक प्रवास नसतो. तो तिच्या समूहाने शतकानुशतके भोगलेल्या अंधार, बहिष्कार आणि अज्ञानाला दिलेला एक ऐतिहासिक लढाऊ प्रतिसाद असतो. पायल ही तिच्या पूर्वजांनी कधी न पाहिलेल्या शैक्षणिक अवकाशात उभी राहून संपूर्ण पिढ्यांचे प्रतिनिधित्व करते. म्हणूनच तिचा लढा हा व्यक्तिगत नसून सामाजिक गतिशीलतेचा लढा आहे. भारतीय समाजात आरक्षणाविषयी सातत्याने एकांगी, अपुऱ्या माहितीवर आधारलेली आणि पूर्वग्रहदूषित चर्चा घडवून आणली जाते. आरक्षणाकडे केवळ आर्थिक गरिबी हटवण्याचा मार्ग किंवा गुणवत्तेशी केलेली तडजोड म्हणून पाहणे हा अत्यंत घातक दृष्टिकोन आहे. आरक्षणाचा मूलभूत विचार समजून घेण्यासाठी काही ऐतिहासिक प्रश्न विचारणे अनिवार्य आहे: भारताच्या इतिहासात सहस्रो वर्षे शिक्षणाचा अधिकार कोणाला नाकारला गेला? ज्ञान, सत्ता आणि संपत्तीच्या साधनांवर कोणाची एकाधिकारशाही होती? सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय नेटवर्क कोणाच्या बाजूने उभे होते? आज ज्याला ‘गुणवत्ता’ म्हटले जाते, ती निर्माण होण्यासाठी आवश्यक असणारी अनुकूल परिस्थिती सर्वांना समान पातळीवर उपलब्ध होती का? ‘जयंती २’ हा चित्रपट आरक्षणाच्या या ऐतिहासिक आणि संरचनात्मक संदर्भाला ठळकपणे समोर आणतो. गुणवत्ता ही पोकळ अवकाशात निर्माण होत नाही. एखादा विद्यार्थी कोणत्या शाळेत शिकला, त्याचे कौटुंबिक वातावरण कसे होते, त्याला अभ्यासासाठी स्वतंत्र खोली, पुस्तके, इंटरनेट आणि मार्गदर्शन मिळाले का, या सामाजिक भांडवलावर त्याची कामगिरी अवलंबून असते. पहिल्या पिढीत शिकणाऱ्या आदिवासी किंवा दलित विद्यार्थ्यांची तुलना पिढ्यानपिढ्या शिक्षणाचा वारसा लाभलेल्या विद्यार्थ्यांशी करणे हीच मुळात घोर विषमता आहे. त्यामुळे आरक्षण ही कोणावर केलेली ‘दया’ किंवा दिलेली ‘भिक’ नसून तो सामाजिक प्रतिनिधित्व आणि समान संधीचा संविधानिक हक्क आहे. चित्रपटाच्या उत्तरार्धात जात प्रमाणपत्राच्या ऐवजी **‘सामाजिक न्यायाचे प्रमाणपत्र’** देण्याची मागणी पुढे येते. हा विचार अत्यंत सखोल, प्रतीकात्मक आणि वैचारिक अर्थाने समृद्ध आहे. सध्याचे जात प्रमाणपत्र हे केवळ त्या व्यक्तीची प्रशासनिक आणि प्रशासकीय ओळख दर्शवते. त्यामुळे अनेकदा विषम मानसिकता असणाऱ्या घटकांना वाटते की, आरक्षणाचा लाभ घेणारा वर्ग हा ‘सवलत लाटणारा’ आहे. याउलट, ‘सर्टिफिकेट ऑफ सोशल जस्टिस’ ही संकल्पना व्यवस्थेची आणि समाजाची ऐतिहासिक जबाबदारी अधोरेखित करते. हे प्रमाणपत्र लाभार्थ्याला दुय्यम ठरवण्यासाठी नसून, समाजाने शतकानुशतके त्याच्यावर केलेल्या अन्यायाची कबुली देऊन त्याला समान पातळीवर आणण्यासाठी कटिबद्ध असल्याचा पुरावा ठरते. आधुनिक ज्ञान आणि विज्ञानाचा स्वीकार केला तरीही माणसांचे जातीय पूर्वग्रह नष्ट होत नाहीत. मेट्रो शहरांमधील वातानुकूलित महाविद्यालये कितीही अद्ययावत असली, तरी तेथील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या मनात जर मनुवादी उतरंड जिवंत असेल, तर ती आधुनिकता केवळ बाह्य देखावा ठरते. खरी आधुनिकता सामाजिक समतेच्या आणि बंधुतेच्या व्यवहारातून सिद्ध होते, हा विचार चित्रपट प्रकर्षाने मांडतो. पायल मरकाम या पात्राच्या माध्यमातून चित्रपटाने ‘आंतरछेदकता’ (Intersectionality) हा समाजशास्त्रीय सिद्धांत अतिशय समर्थपणे मांडला आहे. मानवी जीवनातील विषमता ही कधीही एकरेषीय नसते; तर जात, वर्ग, लिंगभाव (Gender), भाषा, प्रादेशिक पार्श्वभूमी (ग्रामीण-शहरी) हे घटक एकमेकांमध्ये गुंतलेले असतात. पायल ही केवळ एक आदिवासी विद्यार्थिनी नाही, तर ती एक तरुणीदेखील आहे. भारतीय पितृसत्ताक समाजात महिलांकडून नेहमीच शांत राहण्याची, नम्रतेची आणि तडजोड करण्याची अपेक्षा ठेवली जाते. जेव्हा एखादी मुलगी—आणि त्यातही आदिवासी व ग्रामीण पार्श्वभूमीची मुलगी—महाविद्यालयातील दादागिरी आणि जातीय व्यवस्थेविरुद्ध थेट डोळ्यात डोळे घालून जाब विचारते, तेव्हा व्यवस्थेला तिचा स्वाभिमान सहन होत नाही. तिच्या चारित्र्यावर, तिच्या बोलण्याच्या पद्धतीवर आक्षेप घेतले जातात. परंतु, पायल या साच्यात अडकून न पडता अन्यायाला थेट आव्हान देते आणि पीडितेच्या (Victim) भूमिकेतून बाहेर पडून प्रतिरोधाची (Resistance) मशाल हातात घेते. चित्रपट केवळ काल्पनिक कथानक मांडत नाही, तर तो आपल्या देशातील सर्वोच्च शिक्षण संस्थांमध्ये घडणाऱ्या भीषण वास्तवाचे प्रतिनिधित्व करतो. हैदराबाद केंद्रीय विद्यापीठातील **रोहित वेमुला** याच्या आत्महत्येपासून ते मुंबईतील केईएम रुग्णालयातील **डॉ. पायल तडवी** आणि आयआयटी मुंबईमधील **दर्शन सोळंकी** किंवा नागपूरमधील **साहिल वाकोडे** यांच्या प्रकरणांपर्यंत अनेक घटनांनी देशाचा विवेक ढवळून काढला आहे. या आत्महत्या नसून त्या **‘संस्थात्मक हत्या’** आहेत, हे वास्तव हा चित्रपट पाहताना प्रकर्षाने जाणवते. या घटनांमधून स्पष्ट होते की, देशातील आयआयटी, एम्स, केंद्रीय विद्यापीठे आणि वैद्यकीय महाविद्यालयांचे वातावरण वंचित घटकांसाठी अत्यंत विषारी, अलिप्तता निर्माण करणारे आणि प्राणघातक ठरत आहे. दलित-आदिवासी विद्यार्थ्यांना तिथे पावलोपावली त्यांची ‘जात’ आणि ‘कोटा’ दाखवून हिणवले जाते. केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर या घटकातून आलेल्या गुणवंत प्राध्यापकांनाही अशाच छुप्या संस्थात्मक बहिष्काराला सामोरे जावे लागते. गुणवत्ता सिद्ध करूनही ‘हा आरक्षणातून आलेला आहे’ असा शिक्का मारून त्यांच्या संशोधन, अध्यापन आणि प्रशासनिक कामाकडे हीन दृष्टीने पाहिले जाते. इतरांपेक्षा दुप्पट काम करूनही त्यांना सहकाऱ्यांकडून सन्मान मिळत नाही. महाविद्यालयांमधील स्नेहसंमेलने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांतूनही सवर्ण वर्चस्वाचे उदात्तीकरण केले जाते. या सर्व पार्श्वभूमीवर ‘जयंती २’ उच्च शिक्षण संस्थांच्या या सडलेल्या मानसिकतेवर कडक प्रहार करतो. चित्रपटाची आणखी एक अत्यंत सशक्त बाजू म्हणजे विषम व्यवस्थेविरुद्धचा लढा हा केवळ भावनिक घोषणाबाजीने किंवा आक्रंदनाने जिंकता येत नाही, तर त्यासाठी सखोल अभ्यास, वाचन, वैचारिक स्पष्टता आणि तर्कशुद्ध भूमिका लागते, हे केलेले प्रतिपादन होय. डॉ. आंबेडकरांनी दिलेला **‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’** हा मंत्र येथे तंतोतंत लागू पडतो. प्रतिस्पर्ध्याचा मुकाबला करायचा असेल तर त्याच्या प्रतिगामी विचारांची रचना समजून घेऊन संविधानाच्या, पुराव्यांच्या आणि ज्ञानाच्या बळावर त्याला निरुत्तर करावे लागते. आणि यासाठी विद्यार्थ्यांना घडवणारे शिक्षक दीपस्तंभासारखे उभे राहावे लागतात. चित्रपटातील प्रा. गिरिजा देशपांडे आणि प्रा. हेमंत माने या व्यक्तिरेखा विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्यात चिकित्सक विचार आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे बौद्धिक सामर्थ्य निर्माण करतात. चित्रपटातील कलाकारांनी या सर्व पात्रांना आपल्या कसदार अभिनयातून अत्यंत वास्तववादी बनवले आहे: **ऋतुराज वानखेडे (संत्या):** सामाजिक बांधिलकी असलेला, तळागाळातील वास्तवाची जाणीव ठेवून व्यवस्थेला भिडणारा लढाऊ तरुण त्यांनी आपल्या सहज, धारदार संवादफेक आणि देहबोलीतून अप्रतिम उभा केला आहे. **प्रियदर्शिनी इंदलकर (तनुजा):** अन्यायाविरुद्ध तडजोड न करता स्वाभिमानाने आणि ठामपणे उभी राहणारी आधुनिक, सुशिक्षित तरुणी त्यांनी संवेदनशीलतेने साकारली आहे. **पायल जाधव (पायल मरकाम):** आदिवासी विद्यार्थिनीची आंतरिक वेदना, व्यवस्थेने दिलेला संताप, डोळ्यांतील अश्रू आणि त्याच वेळी न्यायासाठी पेटून उठलेली दुर्दम्य जिद्द पायल जाधव यांनी अंगावर काटा आणणाऱ्या अभिनयाने जिवंत केली आहे. **देविका दफ्तरदार (प्रा. गिरिजा), शरद जाधव (प्रा. चव्हाण) व किरण काशिनाथ (प्रा. हेमंत माने):** शैक्षणिक व्यवस्थेतील प्राध्यापकांच्या अंतर्गत गुंतागुंती, नैतिक पेच आणि निष्पक्ष भूमिकेचे पैलू त्यांनी संयत अभिनयातून मांडले आहेत. **रोहिणी हट्टंगडी (प्राचार्य टिळक), विजय निकम (मनोहर साहेब) व राजकुमार जरांगे (प्रताप):** संस्थेचे हितसंबंध जपणारी सत्ताकेंद्रे, राजकीय दबाव आणि व्यवस्थेत ठाण मांडून बसलेली जातीय पूर्वग्रहदूषित मानसिकता या ज्येष्ठ कलाकारांनी आपल्या अनुभवी अभिनयातून अचूकपणे उभी केली आहे. ‘जयंती २’ हा चित्रपट जेव्हा थिएटरच्या पडद्यावर संपतो, तेव्हा प्रेक्षक केवळ एक कथा पाहून बाहेर पडत नाहीत, तर ते अस्वस्थ होऊन व्यवस्थेकडे पाहायला प्रवृत्त होतात. चित्रपटगृहाबाहेर पडल्यानंतरही प्रेक्षकांमध्ये सुरू राहणारी चर्चा हीच या चित्रपटाची खरी ताकद आहे. हा चित्रपट आपल्याला एक अत्यंत महत्त्वाचा संदेश देतो: सामाजिक न्यायाची खरी कसोटी केवळ कोणाला शिक्षणाचे दरवाजे उघडून प्रवेश मिळाला यात नाही; तर प्रवेश मिळाल्यानंतर त्या व्यक्तीला मानवी प्रतिष्ठेने, समतेने आणि सुरक्षिततेने जगता आले का, यात आहे. हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता, तो संविधानातील समता, बंधुता आणि न्यायाची मूल्ये आपल्या शैक्षणिक संस्थांमध्ये आणि सार्वजनिक जीवनात रुजवण्यासाठी एक प्रभावी वैचारिक माध्यम बनतो. हा चित्रपट प्रत्येक प्राध्यापकाने, विद्यार्थ्याने, संस्थाचालकाने आणि सजग नागरिकाने स्वतःच्या अंतर्मनात डोकावून पाहण्यासाठी आवर्जून अनुभवला पाहिजे असा एक ज्वलंत सामाजिक दस्तऐवज आहे.

**प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे**
**समाजशास्त्र विभाग,**
**बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,**
**जालना**